# धर्मप्रांतीय उपासना आयोग, वसई

## सोयरिक झालेल्या मुलामुलींसाठी आशीर्वाद विधी



*हा विधी विशिष्ट परिस्थितीला धरून असावा. इथे देण्यात आलेला विधीक्रम पालक, धर्मगुरू, डीकन किंवा इतर कोणत्याही प्रापंचिकाला वापरता येईल. मात्र त्यांनी ह्या विधीचे प्रमुख घटक आणि रूपरेषा यांमध्ये बदल न करता प्रत्येक भाग परिस्थितीनुसार साजरा करावा. मुला मुलींची सोयरिक झालेली असेल तर हा विधी विवाहपूर्व मार्गदर्शनाच्या धर्मशिक्षणासाठी जमलेल्या विवाहेच्छुकांसाठी वापरला जाऊ शकतो. सोयरिक, वाङ्निश्चय किंवा सोयरिक झालेल्यांना विशेष आशीर्वाद देण्याचा विधी मात्र कधीही मिस्सामध्ये साजरा केला जाऊ नये.*

**गायन** ः *(योग्य गायन घ्यावे.)*

### प्रास्ताविक विधी

ज्याने आपल्यावर प्रेम केले आणि आपल्यासाठी स्वतःचे सर्वस्व अर्पण केले त्या आपल्या प्रभू येशू ख्रिस्ताची कृपा व शांती तुम्हाला लाभो. सर्वजण उत्तर देतात ः आणि तुमच्या अंतर्यामी.

*विधीप्रमुख जर प्रापंचिक असेल तर पवित्र कुसाची खूण काढून झाल्यावर तो आमंत्रितांना पुढील शब्दात अभिवादन करतो ः*

बंधुभगिनींनो, ज्याने आपल्यावर प्रेम केले व आपल्यासाठी स्वतःचे सर्वस्व अर्पण केले त्या आपल्या प्रभू येशू ख्रिस्ताचा आपण गौरव करू या. सर्वजण उत्तर देतात ः आमेन.

*त्यानंतर पुढील किंवा तत्सम शब्दात विधीप्रमुख उपस्थितांना आशीर्वाद स्वीकारण्यासाठी आपल्या अंतःकरणाची तयारी करण्याचे आवाहन करतात ः*

आपणापैकी प्रत्येकाला वेळोवेळी परमेश्वराच्या कृपेची गरज भासते हे आपल्याला ठाऊक आहे. परंतु एका नवीन कुटुंबाची स्थापना करू इच्छिणा-या ख्रिस्ती श्रद्धावंतांना विशेष कृपेची गरज असते यात शंका नाही. आपला बंधू (नाव) आणि आपली भगिनी (नाव) ह्यांच्यात परस्पराविषयी आदरभाव वाढीस लागावा, त्यांनी एकमेकांवर मनापासून प्रेम करावे आणि प्रार्थना व परस्पर सहवास यांद्वारे लग्नाच्या पवित्र साक्रामेंताची शुद्धतेने तयारी करावी म्हणून आपण त्यांच्यावर परमेश्वराचा आशीर्वाद मागू या.

**प्रभूशब्दाचे वाचन** ः *त्यानंतर विधी प्रमुख स्वतः किंवा उपस्थितांपैकी कोणीही पवित्र शास्त्रातील उतारा वाचतात.*

**योहान** १५ ः ९-१२ किंवा १ **करिंथ** १३ ः ४-१३ किंवा होशेय २ ः २१-२३ किंवा **फिलिप्पी** २ ः १-५

*उचित वाटल्यास खालील प्रतिसाद स्तोत्र वाचले किंवा गाईले जाऊ शकते किंवा त्याऐवजी इतर योग्य ते उपासना गीत गाता येईल.* **स्तोत्र** १४५ ः ८-९, १0, १५, १७-१९ - प्रतिसाद ः परमेश्वर सर्वांना किती चांगला आहे !

*त्यानंतर विधीप्रमुख उपस्थितांना उद्देशून शास्त्रवाचनावर प्रकाश टाकणारे बोधपर मार्गदर्शन करतात.*

### श्रद्धावंतांच्या प्रार्थना

*पुढे देण्यात आलेल्या विनंत्यांपैकी विधीप्रमुख प्रसंगाला अनुरूप अशा विनंत्या निवडु शकतात किंवा विशिष्ट परिस्थितीला धरून असलेल्या आणखी काही प्रार्थनांची भर त्यात घालू शकतात.*

मोठ्या आत्मविश्वासाने आपण आपल्या परमेश्वर पित्याची प्रार्थना करू या. त्याने सर्व लोकांवर एवढे प्रेम केले की, त्याने त्यांना ख्रिस्ताठायी आपली मुले बनविले, व जगासमोर त्यांना आपल्या प्रेमाचे साक्षीदार असे प्रकट केले.

**प्रतिसाद** : हे प्रभो, आम्हाला सदैव तुझ्या प्रेमात ठेव.

१. आपल्या परस्परांवरील प्रेमाद्वारे ख्रिस्ताच्या बंधु-भगिनींनी तुझी खरी मुले बनावेत अशी योजना तू आखलीस. प्रतिसाद
२. स्त्री-पुरूषांनी तुझ्या प्रेमळ आज्ञा आनंदाने स्वीकाराव्यात म्हणून तू त्यांच्या खांद्यावर हळूवारपणे ह्या आज्ञांचे ओझे ठेवतोस. प्रतिसाद
३. परस्परावरील प्रेमाने तू स्त्री व पुरूष ह्यांना एकत्र आणतोस आणि त्यांच्या कौटुंबिक जीवन वेलीवर बालपुष्पाचा गौरवशाली मुकूट चढवितोस. प्रतिसाद
४. ख्रिस्ताने आपल्या पास्का रहस्याद्वारे ख्रिस्तसभेवर प्रीती केली आणि आपल्या रक्ताने तिला शुद्ध केले. लग्नाच्या पवित्र साक्रामेंतात तू वैयक्तिक जीवनातील प्रेमाची परिपूर्ती रहस्यमयरित्या सुचित करतोस. प्रतिसाद
५. (नाव) आणि (नाव) ह्यांनी एकादिलाने व एकजिवाने ख्रिस्ती परिवाराशी एकरूप व्हावे म्हणून तू त्यांना प्रेमाच्या ऐक्यात पूर्णपणे सहभागी होण्यासाठी बोलावतोस. प्रतिसाद

*गरजेनुसार इतर विनंत्या समाविष्ट केल्या जाऊ शकतात.*

*स्थानिक रीतीरिवाजानुसार आशीर्वादाच्या प्रार्थनेआधी सोयरिक झालेल्या मुला-मुलीने आपल्या परस्परांमधील प्रेम-वचनाचे चिन्ह असलेली एखादी कृती करावी. उदाहरणार्थ, कागदपत्रावर सह्या करणे, एकमेकांना भेटवस्तू किंवा अंगठ्या देणे. सोयरिकीच्या अंगठ्या किंवा भेटवस्तूंना पुढील शब्दात आशीर्वाद देता येईल.*

तुम्ही एकमेकांना दिलेल्या वचनांची योग्य वेळी परिपूर्ती व्हावी म्हणून तुम्ही आता एकमेकांना देत असलेली ही दाने सुरक्षित ठेवा. प्रतिसाद : आमेन.

## आशीर्वादाची प्रार्थना

*विधीप्रमुख हात जोडून प्रार्थना करतात. जर धर्मगुरू किंवा डीकन प्रार्थना करणार असतील तर ते आपले हात विस्तारतात.*

**विधीप्रमुख** : हे प्रभो, तुझ्या प्रेमळ ज्ञानाने तू तुझा पुत्र (नाव) आणि तुझी कन्या (नाव) ह्यांना एकमेकांवर प्रेम करण्यासाठी बोलावलेले आहेस म्हणून आम्ही तुझे स्तवन करतो. तुझ्या कृपेने त्यांची हृदये सशक्त कर. विश्वासूपणे आणि सर्व गोष्टीमध्ये तुला संतुष्ट करून एक दिवस त्यांना विवाह साक्रामेंताचा सोहळा साजरा करण्याचे भाग्य लाभो. ही प्रार्थना आम्ही आमच्या प्रभू ख्रिस्ताद्वारे करतो. प्रतिसाद : आमेन.

*धर्मगुरू किंवा डीकन पुढील शब्दांत प्रार्थना करतात :*

**धर्मगुरू किंवा डिकन** : हे प्रभो परमेश्वरा, तू सर्व प्रेमाचा लकलकता झरा आहेत. तुझ्या दयामय योजनेद्वारे (नाव) आणि (नाव) ह्यांची एकमेकांशी भेट झाली. आता ते आपल्या लग्नाची रीतसर पूर्वतयारी करीत आहेत. त्यासाठी ते तुझ्या कृपेची याचना करीत आहेत. स्वर्गीय + आशीर्वादाने परिपूर्ण होऊन त्यांनी परस्परांवरील आदरभावनेत वाढत जावे आणि एकमेकांवर मनापासून प्रेम करावे असे वरदान त्यांना दे. ही प्रार्थना आम्ही आमच्या प्रभू ख्रिस्ताद्वारे करतो. प्रतिसाद : आमेन.

## विधीचा समारोप

*विधीप्रमुख विधीचा समारोप पुढील शब्दात करतात :*

प्रीतीचा व शांतीचा देव तुम्हामध्ये वस्ती करो, तुम्हाला पावलोपावली मार्गदर्शन करो आणि त्याच्या प्रेमाने तुमची हृदये सशक्त करो. सर्व : आमेन.

*एखाद्या उचित गायनाने विधीचा समारोप करणे स्तुत्य ठरेल.*